आजचा दिनविशेष
१९०५ : भारताचे व्हाईसरॉय लॉर्ड कर्झन यांनी बंगालच्या फाळणीचा आदेश दिला.

दैनिक
लोकक्रांतीचा आरंभ
# लोकआरंभ

All TOURS घर से घर तक
SUN Tourism INTERNATIONAL PVT. LTD. Since 2007
दिल से दिल तक
www.suntourismpune.in
सन टुरिझम
प्रस्तुत करते
देशांतर्गत आणि आंतरराष्ट्रीय ग्रुप टूर्स !
आमच्या विशेष टूर पॅकेजेस
काश्मीर, वैष्णोदेवी, नैनीताल, शिमला, अयोध्या ग्रँड युरोप, ऑस्ट्रेलिया, जपान, दुबई, श्रीलंका व्हिएतनाम, सिंगापूर, थायलंड, बाली
आता आपल्या स्वप्नांच्या सहलींची नोंदणी करा...
-: अधिक माहितीसाठी संपर्क :-
99222 22272 / 7602727555


dainiklokaarambh@gmail.com
LOK AARAMBH
संपादक:राहुल मारोतीराव वाईकर
कार्यकारी संपादक गोकुळ इंगोले

बीड/महाराष्ट्र | वर्ष ३ रे | गुरुवार १६ ऑक्टोबर २०२५ | अंक २९४ | पाने ४ | RNI/MAHMAR/2022/84215 | किंमत २ रु

# सरकारी आदेश आला! शेतकऱ्यांच्या खात्यात दिवाळीपूर्वीच पैसे जमा होणार, कोणत्या जिल्ह्यांना मिळणार मदत?

काही दिवसांपूर्वी झालेल्या अतिवृष्टीमुळे मराठवाडा तसेच विदर्भ आणि महाराष्ट्रातील इतर भागातील शेतकऱ्यांचे मोठे नुकसान झाले. काही ठिकाणी जमीन खरडून गेली. तर काही ठिकाणी शेतातील उभे पीक पाण्याखाली गेली. हे नुकसान लक्षात घेऊन सरकारने शेतकऱ्यांच्या मदतीसाठी 31 हजार कोटींची आर्थिक मदत जाहीर केली. ही मदत नेमकी कधी मिळणार याबाबत अनिश्चितता होती. आता मात्र याबाबतचा संभ्रम दूर झाला आहे. सरकारने एक आदेश जारी केला आहे. या आदेशात सरकारने 480 कोटी रुपयांच्य वाटपास मंजुरी दिली आहे. म्हणजेच आता शेतकऱ्यांच्या खात्यात दिवाळीआधाची पैसे येण्याची शक्यता वाढली आहे. दिवाळीपूर्वीच पैसे वाटपाच्या प्रक्रियेला सुरुवात झाली आहे. काही जिल्ह्यांसाठी 480 कोटी रुपये मंजूर

राज्यात अतिवृष्टीच्या पार्श्वभूमीवर दिवाळीआधी शेतकऱ्यांना मदत देण्यास सरकारकडून सुरुवात करण्यात आली आहे. सरकारने काढलेल्या ताज्या जीआरनुसार सरकारने काही जिल्ह्यात 480 कोटी रुपये वाटपास मंजुरी दिली आहे. अमरावती विभागातील अकोला, बुलढाणा, वाशिम आणि संभाजीनगर विभागातील जालना व हिंगोली जिल्ह्यांत अतिवृष्टी आणि पूर यामुळे शेतीपिकांच्या नुकसानीसाठी शेतकऱ्यांना मदत मंजूर करण्यात आली आहे. म्हणजेच आता वर नमूद करण्यात आलेल्या जिल्ह्यातील शेतकऱ्यांना दिवाळीपूर्वीच आर्थिक मदत मिळण्याची शक्यता वाढली आहे. लवकरच अन्य





जिल्ह्यांसाठी शासन निर्णय जारी होणार

ऑगस्ट आणि सप्टेंबरमधल्या अतिवृष्टीच्या पार्श्वभूमीवर शेतकऱ्यांना ही मदत केली जात आहे. येत्या काळात आणखी काही जिल्ह्यातील शेतकऱ्यांना मदतीसंदर्भात शासन निर्णय जारी करण्यात येणार येणार आहे. तशी माहिती सूत्रांनी दिली आहे. तत्पूर्वी सरकारने सध्या मंजूर केलेल्या 480 कोटी रुपयांच्या निधीमुळे काही शेतकऱ्यांना आर्थिक मदत मिळण्यास लवकरच सुरुवात होणार आहे. निधी मंजूर झाल्यानंतर आता पुढची प्रक्रिया पार पाडली जाणार आहे. त्यानंतर शेतकऱ्यांच्या खात्यात पैसे जमा केले जातील दरम्यान, सरकारच्या या जीआरनंतर आता प्रशासकीय पातळीवर घडामोडींना वेग आला आहे. लवकरच आता शेतकऱ्यांच्या थेट बँक खात्यावर पैसे जमा केले जातील. सर्व नियमांचे पालन करूनच निधीचे वितरण करण्यात यावे, असे या शासन निर्णयात सांगण्यात आले आहे.

## पत्रकार बालाजी जगतकर यांना पितृशोक श्रावणराव जगतकर यांचे दुःखद निधन

परळी प्रतिनिधी - परळी येथील सुपरिचित व्यक्तिमत्व श्रावणराव नामदेवराव जगतकर वय 75 यांचे अल्पशा आजाराने दि. 16 ऑक्टोबर 2025 रोजी रात्री 1, 30 दरम्यान निधन झाले. श्रावणराव जगतकर मितभाषी मनमिळावू स्वभावाचे व पँथरचे सक्रिय कार्यकर्ते होते. त्यांनी समाजकार्यात हिरीरीने सहभाग नोंदवला आहे. विद्युत निर्मिती थर्मल पावर स्टेशन येथे ते नोकरीला लागल्यानंतर त्यांनी आपली समाज सेवा व कार्य चालूच ठेवले होते. त्यानंतर विद्युत वितरण



कंपनीत त्यांनी आपली सेवा दिली व त्याच ठिकाणी सेवानिवृत्त झाले. त्यांनी धार्मिक कार्यात सतत पुढाकार घेतला होता. त्यांच्याजाने एक मोठी पोकळी परळी शहरात निर्माण झाली आहे. त्यांच्या पश्चात दोन मुले पत्रकार बालाजी जगतकर व दुसरा मुलगा राजू जगतकर बुलेट रेल्वे कतार येथे मॅनेजर आहे.एक मुलगी व सुना नातवंडे असा भरगच्च परिवार आहे. त्यांच्या पार्थिवावर 16 ऑक्टोबर 2025 रोजी सायंकाळी अंत्यसंस्कार करण्यात येणार आहेत.

## तरुणांना व्यवसायासाठी सुवर्ण संधी; शहराच्या मध्यवर्ती ठिकाणी न.प.चे सुसज्ज गाळे किरायाणे देण्यासाठी उपलब्ध

### ई–लिलाव प्रक्रियेत सहभाग घ्यावाम मुख्याधिकारी त्रिंबक कांबळे

परळी (प्रतिनिधी )– परळी शहरातील व्यापाऱ्यांसाठी आणि नागरिकांसाठी नगर परिषद परळी वैजनाथ तर्फे एक सुवर्णसंधी उपलब्ध झाली आहे. शहराच्या मध्यवर्ती भागातील उड्डाणपुलाजवळ न.प.तर्फे बांधण्यात आलेले सुसज्ज गाळे आता ई-लिलाव प्रणालीद्वारे किरायाने देण्यासाठी उपलब्ध होणार आहेत. या गाळ्यांचे स्थान अत्यंत व्यावसायिक दृष्टीने महत्त्वाचे असून, वाढत्या व्यापारी हालचालींमुळे हे ठिकाण व्यवसाय विस्तारासाठी अत्यंत लाभदायक ठरणार आहे. नागरिक आणि व्यापाऱ्यांनी या संधीचा लाभ घ्यावा असे आवाहन नगर परिषद परळी वैजनाथचे मुख्याधिकारी त्रिंबक कांबळे यांनी केले आहे. या संदर्भातील अधिकृत सूचना 15 ऑक्टोबर 2025 रोजी www.mahatenders.gov.in या संकेतस्थळावर प्रसिद्ध करण्यात आली आहे. ई-निविदा / ई-लिलावाबाबतची सर्व माहिती, अटी आणि शर्ती याच ठिकाणी उपलब्ध आहेत. इच्छुक नागरिक आणि व्यापाऱ्यांनी आपली निविदा 29 ऑक्टोबर 2025 रोजी सायं. 4.00 वाजेपर्यंत भरावी. पात्र निविदाधारकांना 4 नोव्हेंबर 2025 रोजी सकाळी 11.00 ते दुपारी 4.00 वाजेपर्यंत ई-लिलाव प्रक्रियेत सहभागी होता येईल. दरम्यान मुख्याधिकारी कांबळे यांनी सांगितले की, नगर परिषदेच्या पारदर्शक ई-लिलाव प्रणालीमुळे नागरिकांना आणि व्यापाऱ्यांना समान संधी उपलब्ध होत आहे. शहराच्या मध्यभागी व्यवसायासाठी योग्य अशा सुसज्ज गाळ्यांचा लाभ घ्यावा असे आवाहन त्यांनी केले आहे. ही ई-लिलाव प्रक्रिया केवळ पारदर्शकतेचे उदाहरण नसून परळी शहराच्या व्यापारी विकासासाठी एक नवा टप्पा ठरणार आहे.



## बीड येथील ओबीसी महाएल्गार सभेस लाखोच्या संख्येने उपस्थित रहावे – राहुल भराटे

### शुक्रवारी छत्रपती संभाजी महाराज क्रीडा संकुलाच्या प्रांगणात होणार ओबीसींचा महाएल्गार!

बीड प्रतिनिधी .अंकुश गवळी ओबीसी समाजाच्या न्याय हक्कासाठी ओबीसी समाजाचे राष्ट्रीय नेते ना. छगनराव भुजबळ साहेब यांच्या उपस्थितीत शुक्रवार दि. 17 ऑक्टोबर 2025 रोजी दुपारी 4 : 00 वाजता बीड येथे ओबीसी महाएल्गार सभेचे आयोजन करण्यात आले असून ओबीसी महाएल्गार सभेला ओबीसी समाज बांधव, भगिनींनी, युवक, युवती, विद्यार्थी आणि कार्यकर्त्यांनी लाखोंच्या संख्येने उपस्थित राहावे आव्हान डॉ. स्नेहा सोनकाटे यांनी केले आहे शुक्रवार दि. 17 ऑक्टोबर 2025 रोजी दुपारी 4 : 00 वाजता बीड शहरातील छत्रपती शिवाजी महाराज चौक येथील छत्रपती संभाजी महाराज क्रीडा संकुलाच्या प्रांगणात ओबीसी समाजाचे राष्ट्रीय नेते तथा कॅबिनेट मंत्री ना. छगनराव भुजबळ साहेब यांच्या प्रमुख उपस्थितीत ही महाएल्गार सभा होणार असून याप्रसंगी जालना जिल्ह्याच्या पालकमंत्री तथा राज्याच्या पर्यावरण मंत्री ना. पंकजाताई मुंडे, माजी मंत्री आ. धनंजयजी मुंडे साहेब,माजी मंत्री जयदत्त अण्णा क्षीरसागर, धनगर समाजाचे नेते प्रकाश शेंडगे, आ. गोपीचंद पडळकर, मुस्लिम समाजाचे नेते शब्बीर अन्सारी, प्रा. लक्ष्मण हाके, ज्येष्ठ साहित्यिक तथा भटक्या विमुक्त समाजाचे नेते लक्ष्मणराव गायकवाड, शिवा संघटनेचे संस्थापक प्रा.



मनोहर धोंडे, सयाजी झुंजार, राजाराम पाटील, नवनाथ वाघमारे, ॲड. मंगेश ससाने, वंजारी समाजाचे नेते सत्संग मुंडे, ईश्वर बाळबुधे आदींची प्रमुख उपस्थिती लाभणार आहे. ओबीसी आरक्षण अखंडित राहावे, ओबीसींच्या लेकरांना आरक्षणाचा लाभ मिळावा, ओबीसी समाजातील लेकरांच्या भवितव्यासाठी आणि ओबीसी समाजाच्या न्याय हक्काच्या मागणीसाठी सदरील महाएल्गार सभा होणार असून ओबीसी समाज बांधव, भगिनींनी, युवक, युवती, विद्यार्थी आणि कार्यकर्त्यांनी लाखोंच्या संख्येने उपस्थित राहावे असे आवाहन राहुल भराटे यांनी केले आहे

## बीड शहरात नर्सरी रोडवरील फटाके स्टॉल्स धोक्याची घंटा

बीड (प्रतिनिधी): दिवाळीच्या पार्श्वभूमीवर बीड शहरातील नर्सरी रोड परिसरात फटाके विक्रीसाठी उभारण्यात आलेली दुकान नागरिकांसाठी धोकादायक ठरत आहेत. रोडच्या कडेला असलेली ही दुकाने अग्निसुरक्षेच्या नियमांविना उभी असल्याने मोठ्या अपघाताची शक्यता उभी आहे. स्थानिकांनी सांगितले की, फटाके विकणारे स्टॉल्स गर्दीच्या रस्त्यावर, आणि अग्निशामक साधनांशिवाय उभारलेले आहेत. अनेक स्टॉलमध्ये विजपुरवठा जवळ ठेवलेला आहे, ज्यामुळे अग्निकांडाचा धोका दुपटीने वाढतो आहे. नागरिकांनी पोलीस आणि नगरपालिका प्रशासनाकडे



तात्काळ कारवाईची मागणी केली आहे. त्यांनी सुचवले की: बिनपरवाना किंवा बिनसुरक्षा स्टॉल्स हटवाव्यात, सर्व फटाके विक्रेत्यांना सुरक्षा प्रमाणपत्र दिल्यानंतरच विक्रीला परवानगी द्यावी, पोलीस आणि अग्निशमन विभागाची संयुक्त तपासणी नियमितपणे होावी. दरम्यान, बीड नगरपालिका आणि पोलीस प्रशासनाकडून अद्याप कोणतीही ठोस कारवाई झालेली नाही. नागरिकांच्या मते, “जर त्वरित कारवाई झाली नाही तर कोणतीही अपघात घडल्यास प्रशासन जबाबदार राहील.”

## बीड नगरपरिषद निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर डॉ.योगेश क्षीरसागर यांनी बोलावली बैठक



बीड (प्रतिनिधी) दि.१५ : आगामी नगरपरिषद निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे बीड विधानसभा अध्यक्ष डॉ.योगेश क्षीरसागर यांनी शहरातील सौ.के.एस.के. महाविद्यालयाच्या सभागृहात आज (दि.१६) सायंकाळी ४ वाजता बैठक आयोजित केली आहे. या बैठकीत आगामी निवडणुकीची रणनीती, संभाव्य उमेदवारांबाबत प्राथमिक चर्चा होणार आहे. नगरपरिषद निवडणूक नियोजनबद्ध पद्धतीने लढविली जाणार आहे. त्यामुळे आजच्या बैठकीस स्थानिक कार्यकर्ते, इच्छुकांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहावे, असे आवाहन राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे बीड विधानसभा अध्यक्ष नेते डॉ.योगेश क्षीरसागर यांनी केले आहे.

## तुळजाभवानी अर्बन मल्टिस्टेट को–ऑप. क्रेडिट सोसायटीला राज्यस्तरीय दिपस्तंभ पुरस्कार २०२४–२५




माजलगाव (प्रतिनिधी) : सहकार क्षेत्रात उल्लेखनीय कार्य करताना सभासदांच्या प्रगतीला प्राधान्य देणाऱ्या तुळजाभवानी अर्बन मल्टिस्टेट को-ऑप. क्रेडिट सोसायटी लि., माजलगाव या संस्थेला मोठा सन्मान मिळाला आहे. महाराष्ट्र राज्य सहकारी पतसंस्था फेडरेशन लि. तर्फे दिला जाणारा प्रतिष्ठेचा “दिपस्तंभ पुरस्कार सन 2024-25” संस्थेला जाहीर झाला. या पुरस्काराचे वितरण 13 ऑक्टोबर 2025 रोजी गोकर्ण, कर्नाटक येथे आयोजित भव्य कार्यक्रमात करण्यात आले आहे.या प्रसंगी संस्थेचे अध्यक्ष श्री. चंद्रकांत शेजूळ व उप मुख्य कार्यकारी श्री. अशोक शेजूळ यांनी दिपस्तंभ पुरस्कार स्वीकारला संस्थेच्या सर्वांगीण प्रगती, नाविन्यपूर्ण सेवा व सामाजिक बांधिलकीच्या कार्याचा सन्मान म्हणून हा गौरव मिळाल्याचे फेडरेशनने स्पष्ट केले आहे.

### “सभासदांच्या विश्वासाला मुकुट – तुळजाभवानी अर्बनला दिपस्तंभ पुरस्कार”

संस्थेच्या या यशाबद्दल अध्यक्ष मा. चंद्रकांत शेजूळ साहेब, सीईओ मा. शहाजी शेजूळ साहेब, तसेच संचालक मंडळ व सर्व कर्मचारीवृंद यांनी आनंद व्यक्त केला.“हा पुरस्कार म्हणजे आमच्या सभासदांच्या विश्वासाचे प्रतिक आहे. तुळजाभवानी अर्बनने सदैव सभासद व ग्राहककेंद्री काम केले आहे. भविष्यात आणखी आधुनिक सुविधा व उत्तम सेवा उपलब्ध करून देण्याचा आमचा संकल्प आहे,” असे अध्यक्ष मा. चंद्रकांत शेजूळ साहेब यांनी सांगितले.यशामुळे संस्थेच्या सर्व सभासदांमध्ये उत्साह नवी दिशा देणारा ठरेल, असा विश्वास सीईओ मा. शहाजी शेजूळ साहेब यांनी व्यक्त केला.

दैनिक लोकक्रांतीचा आरंभ
लोकआरंभ
संपादक:राहुल मारोतीराव वाईकर

गुरुवार १६ ऑक्टोबर २०२५
https://lokaarambh.com



## सं पा द की य

### भारताच्या अडचणी वाढल्या? चीननं उचललं मोठं पाऊल,




आंतरराष्ट्रीय बाराजात चीन हा भारताचा मोठा आणि महत्त्वाचा स्पर्धक आहे. गेल्या काही वर्षांपासून भारत आत्मनिर्भरतेवर जास्त भर देत आहे. याच धोरणाचा भाग म्हणून देशांतील कंपन्यांना प्रोत्साहन देण्याचे काम भारतीय सरकारकडून केले जात आहे. असे असतानाच मात्र भारताची ही नीती चीनला आवडलेली नाही. भारताच्या इलेक्ट्रिक वाहनांच्या धोरणामुळे चीनचे मोठे नुकसान होत आहे. याच कारणामुळे चीनने भारताविरोधात थेट तक्रार दाखल केली आहे. आता या तक्रारीमुळे चीन-भारत यांच्यातील व्यापारविषयक संबंध बिघडण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे. चीनने भारताविरोधात तक्रार का केली?

चीनने भारताविरोधात जागतिक व्यापार संघटनेकडे (WTO) तक्रार केली आहे. भारताच्या इलेक्ट्रिक वाहन आणि बॅटरी उत्पादन धोरणावर चीनने आक्षेप घेतला आहे. सोबतच इलेक्ट्रिक वाहन निर्मिती आणि बॅटरी निर्मिती उद्योगांना भारत सरकारने दिलेल्या वेगवेगळ्या अनुदान योजनांवरही चीनने आक्षेप घेतला आहे. भारताच्या या धोरणामुळे भारतातील कंपन्यांना विषम स्पर्धेचा फायदा मिळत आहे. यामुळे चीनच्या आर्थिक हिताचे नुकसान होत आहे, असे चीनने आपल्या तक्रारीत म्हटले आहे. चीनने आपल्या तक्रारीत नेमकं काय म्हटलंय?

भारताचे ईव्ही धोरण तसेच बॅटरी निर्मितीसाठीच्या सबसीडी योजना या आंतरराष्ट्रीय व्यापाराच्या निष्पक्ष नियमांच्या विरोधात आहेत. या योजनांच्या माध्यमातून भारत आपल्या देशांतर्गत उद्योगांना प्रोत्साहन देत आहे. यामुळेच भारतात परदेशी कंपन्यांना असमान स्पर्धक मिळत आहे. भारताकडून लागू केल्या जात असलेल्या अनुदानाच्या योजना या वैश्विक व्यापार व्यवस्थेच्या मूळ सिद्धांताच्या विरोधात आहेत, असे चीनने आपल्या तक्रारीत म्हटले आहे. सोबतच चीन आपल्या अधिकारांसाठी कायदेशीर पद्धतीने आवाज उठवणार असल्याचेही चीनने स्पष्ट केले आहे. भारताचा नेमका हेतू काय आहे?

इलेक्ट्रिक वाहनांची निर्मिती तसेच बॅटरी निर्मितीत वाढ व्हावी यासाठी भारत सरकारने अनेक योजना आणल्या आहेत. यामध्ये FAME-II योजना आणि पीएलआय अशा काही योजनांचा समावेश आहे. देसात इलेक्ट्रिकल वाहनांचे उत्पादन वाढावे. आयातीवरचे अवलंबित्व कमी व्हावे, स्वदेशी निर्मितीला प्रोत्साहन मिळावे, असा सरकारचा हेतू आहे. दरम्यान, आता चीनने सरकारच्या या धोरणांनाच विरोध केल्यामुळे आता नेमके काय होणार? चीनच्या या तक्रारीवर भारत काय भूमिका घेणार? हे पाहणे महत्त्वाचे ठरणार आहे.


# उमरा येथे बुद्ध मूर्ती प्रतिष्ठापना व विहाराचा लोकार्पण सोहळा

नांदेड प्रतिनिधी : बालाजी सिरसाट

नांदेड : लोहा तालुक्यातील उमरा येथे भव्य बुद्ध मूर्ती प्रतिष्ठापना व विश्वशांती नालंदा बुद्ध विहार लोकार्पण सोहळा पुज्यनिय भन्ते वि संघपाल थेरो (चैत्यभूमी दादर मुंबई) यांच्या शुभ हस्ते व पुज्यनिय भिक्खु पैख्या बोधी थेरो प्रमुख धमनेर प्रशिक्षण केंद्र (खुरणाय नांदुसा) व पु.भन्ते बोधी धम्मा तपोवन बुरुदभुमी, गौळेगाव व पुज्यनिय भिक्खु संघाच्या उपस्थितीत दिनांक १७–ऑक्टोबर २०२५ रोजी संपन्न होणार असून या कार्यक्रमासाठी सर्व जनतेने उपस्थित राहण्याचे आवाहन विश्वशांती नालंदा बुद्ध विहाराच्या आयोजकांनी तसेच समस्त गावकरी मंडळी उमरा यांनी केले आहे.

कार्यक्रमाची रुपरेषा : सकाळी ६ वाजता विहारात भिक्खु संघ परित्राण पाठ सकाळी ९ वा. बुध्द मुर्तिची मिरवणूक मोहनराव गोविंदराव सिरसाट यांच्या गोविंदराज निवासा पासून भव्य मिरवणूक निघेल. ही मिरवणूक गावातील प्रमुख रस्त्याने विश्वशांती नालंदा बुध्द विहार रामजी आंबेडकर नगर येथे पोहचेल.सकाळी १०.३० वा. पंचशील जजारोहन सकाळी ११ वा भिक्खु संघास भोजनदान दुपारी १ वा. पु.भन्ते बि संघपाल थेरो चैत्यभुमी दादर मुंबई यांच्या हस्ते मूर्ती प्रतिष्ठापणा व पंचशिल ध्वजारोहन होईल.

रामजी आंबेडकर नगर येथे विश्वशांती बुद्ध विहाराची निर्मिती बुद्ध विहाराचे अध्यक्ष, सचिव यांनी त्यांच्या सर्व नवयुवक सहकाऱ्यांना सम ाजबांधवांना सोबत घेऊन समाजातील दानशूर व्यक्तींच्या सहकार्याने बुद्ध विहार उभारणीला



वेग दिला.आणि एक भव्य वास्तू उभी राहिली.

विश्वशांती नालंदा बुद्ध विहाराच्या बांधकामासाठी दान दिलेल्या सर्व दानदात्यांचे आम्ही ऋणी असल्याचे विहाराच्या आयोजकाकडून ऋण व्यक्त करण्यात आले.विश्वशांती बुद्ध विहाराच्या निर्मितीत व विविध सामाजिक धार्मिक कार्यात ज्या ज्या मान्यवरांनी मोलाचे सहकार्य मार्गदर्शन केले योगदान दिले त्या मान्यवरांचा गौरव व सत्कार करण्यात येईल.

रात्री ८ वाजता बुद्ध भीम गीतांचा क्रांतिकारी जलसा भीमा तुझ्या जन्मामुळे अंकुश राज चित्ते यांचा बहारदार गीतांचा कार्यक्रम संपन्न होईल. सर्व जनतेने या अभूतपूर्व सोहळ्यात उपस्थित राहून ऐतिहासिक क्षणाचे साक्षीदार व्हावे असे आवाहन विश्वशांती बुद्ध विहार संस्थान व समस्त गावकरी मंडळी उमरा यांनी केले आहे.

# दरसांगवी येथील शेतकऱ्याच्या विद्युत,मोटारीसह

## केबल,पाईप,सोलार,चोरीला : शेतकऱ्याचे मोठे आर्थिक नुकसान

नांदेड प्रतिनिधी : बालाजी सिरसाट

किनवट : तालुक्यातील दरसांगवी येथील शेतकरी अरविंद सूर्यवंशी यांच्या शेतातील विद्युत मोटार केबल पाईप सोलार चोरीला गेले असून संबंधित शेतकऱ्यांचे मोठ्या प्रमाणात आर्थिक नुकसान झाले आहे.शेतकरी आधीच ओल्या दुष्काळाच्या संकटात असून आणखीनही त्याच्यात पदरी ही अशी निराशा येत असून बळीराजा प्रचंड मनस्तापात जगत आहे.पोलीस प्रशासनाने याचे गांभीर्य लक्षात घेऊन चोरट्यांचा बंदोबस्त करून जेलबंद करण्याची मागणी शेतकऱ्यांनी केली आहे.




या भागात सतत शेतकऱ्यांच्या शेतीतील विद्युत मोटार,केबल,अन्य साहित्याच्या चोरीच्या घटना घडत असून यामुळे शेतकऱ्यांचे मोठे आर्थिक नुकसान होत आहे.किनवट पोलीस स्टेशन मध्ये गुन्हा दाखल होऊन पंधरा दिवस उलटून गेले तरी त्यांच्यावर कठोर कारवाई झाली नाही. चोरी झालेल्या शेतातील शेतकऱ्यांनी मुद्देमाल जप्त करूनही पंधरा दिवसापासून पोलिसांची दिरंगाई केली.गुन्हा दाखल होऊन सुद्धा जर पंधरा दिवस लागत असेल तर जनतेने पोलिसाकडे न्याय मागवा का ? नाही हा प्रश्न शेतकऱ्यांना पडला आहे.याआधीच पावसामुळे शेतकऱ्यांच्या शेती पिकांचे प्रचंड नुकसान झाले आहे.पिके वाहून गेली, सिंचन व्यवस्था विस्कळीत झाली आहे.अशा परिस्थितीत विहीरीवरील विद्युत मोटारी केबल चोरी झाल्याने शेतकऱ्यांचे सिंचन पुन्हा ठप्प झाले असून या घटनेमुळे त्यांच्या दुःखात संकटात अधिक भर पडली आहे.वाढत्या चोरीमुळे शेतकरी त्रस्त झाले आहेत.दरसांगवी (चि) शिवारातील अनेक शेतकऱ्यांच्या विद्युत मोटारी व अनेक शेतीतले अवजारे चोरांनी लंपास केले आहेत.या घटनेने परिसरातील शेतकरी वर्गात संतापाचे वातावरण आहे. वेळीच पोलिसांनी चोरट्यांना जेलबंद करून योग्य ती कारवाई करण्याची मागणी शेतकऱ्यांतून होत आहे.

# सलग 'सात तास वाचन' हा उपक्रम यशस्वीरित्या राबवून -"ग्रंथप्रेम जागवणारा वाचन प्रेरणा" दिन उत्साहात साजरा





पाटोदा ( प्रतिनिधी) दिनांक :१५ ऑक्टोबर : पाटोदा येथील जयभवानी शिक्षण प्रसारक मंडळाचे, कला व विज्ञान महाविद्यालय, पाटोदा यांच्या ग्रंथालय विभागाच्यावतीने दिनांक १५ ऑक्टोबर २०२५ रोजी भारताचे ज्येष्ठ शास्त्रज्ञ आणि माजी राष्ट्रपती भारतरत्न डॉ.ए.पी.जे.अब्दुल कलाम यांची जयंती 'वाचन प्रेरणा दिन' म्हणून उत्साहात साजरी करण्यात आली. या जयंती निमित्ताने महाविद्यालयात सलग 'सात तास वाचन' हा उपक्रम यशस्वीरित्या राबविण्यात आला. यावेळी भारतरत्न डॉ. ए. पी. जे. अब्दुल कलाम यांना अभिवादन करण्यात आले. या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी प्राचार्य डॉ.सदाशिव सरकटे व प्रमुख पाहुणे म्हणून श्री. शिवाजीराव पंडित महाविद्यालय, शिवाजीनगर,गढी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.विश्वास कदम हे प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते तर व्यासपीठावर प्रा. सोमनाथ घाडगे,कनिष्ठ विभाग प्रमुख प्रा. प्रकाश नाईकवाडे ,प्रा.गोपाळ धांडे, व अंतर्गत मुल्यमापन समितीचे प्रमुख प्रा विनोद किर्दक यांची उपस्थिती होती. प्रारंभी मान्यवरांच्या हस्ते डॉ.ए.पी.जे.अब्दुल कलाम यांच्या प्रतिमेचे पूजन करण्यात आले. यावेळी प्रा.डॉ. अशोक देवगुडे यांनी प्रास्ताविका मध्ये भारतरत्न डॉ.ए.पी. जे. अब्दुल कलाम यांच्या जीवन कार्याविषयी माहिती सांगितली. ते म्हणाले की, स्वप्न ते नव्हे जे झोपल्या नंतर पडते तर खरे स्वप्न ते असते जे तुम्हाला पूर्ण केल्याशिवाय झोपूच देत नाही. म्हणून प्रत्येकाने आपल्या ध्येयापर्यंत पोहचण्यासाठी वाचन केले पाहिजे. त्यासाठी ग्रंथालय विभाग प्रमुख प्रा. ज्योती रकटे यांच्या वतीने विद्यार्थ्यांना वाचनाची गोडी लागावी म्हणून प्रमुख पाहुणे प्राचार्य डॉ. विश्वास कदम आणि उपथित मान्यवरांच्या हस्ते वाचनीय पुस्तकांचे वाटप करण्यात आले. तसेच विद्यार्थ्यांमध्ये वाचनाची सवय लागावी या हेतूने सलग 'सात तास वाचन' हा उपक्रम यशस्वीरित्या राबविण्यात आला. प्रा.सोमनाथ घाडगे यांनी सांगितले की ग्रंथ हे माणसाच्या जीवनात बदल घडविणारे, अवगुणांचे सगुणात रूपांतर करणारे, विनाशापासून वाचविणारे असे ते ग्रंथ म्हणून तरुण पिढीने ग्रंथ वाचली पाहिजेत. प्रमुख पाहुणे प्राचार्य डॉ. विश्वास कदम म्हणाले की, 'तुम्हाला तुमचे व्यक्तिमत्त्व घडवायचे असेल तर वाचन करा' असा संदेश दिला. धावत्या युगाच्या बरोबरीने धावायचे असेल तर वाचन करा, असा संदेश त्यांनी दिला. डॉ.कलाम यांनी लिहिलेल्या अनेक पुस्तकांमधून येणाऱ्या काळात भारत कसा महासत्ता म्हणून पुढे येणार आहे, भारताची खरी शक्ती ही युवाशक्ती आहे हे त्यांनी सांगितले.

या कार्यक्रमाचे सूत्रसंचलन प्रा. डॉ. बंडू लोखंडे यांनी केले तर या कार्यक्रमाचे आभार महाविद्यालयाच्या ग्रंथपाल प्रा. ज्योती रकटे यांनी मानले. या प्रसंगी महाविद्यालयातील प्राध्यापक वृंद,व बहुसंख्य विद्यार्थी उपस्थित होते.

******

# सफियान मणियार – समाज कारणात झोकून दिलेला तरुण

## सुशिक्षित तरुणांना निवडणुकीत सहभागी करणे हे आपल्याच भविष्याची हमी आहे

सफियान मणियार या तरुणाने गेल्या अनेक वर्षांपासून समाजकारणात स्वतःला पूर्णपणे झोकून दिले आहे. समाजातील प्रत्येक घटकासाठी त्यांनी केलेले सामाजिक कार्य गाजलेले आहे. तरुणाईसाठी प्रेरणादायी ठरलेला सफियान आज एक सुशिक्षित, प्रामाणिक आणि कार्यक्षम चेहरा म्हणून उभा आहे. त्यांची ओळख फक्त एका भागापुरती मर्यादित नसून, त्यांनी CAA,NRC च्या मोमेंट मध्ये संपूर्ण महाराष्ट्रात जितकं शाहीम बाग होतं त्यापैकी बरेच शाहीन बागला भेट देऊन मार्गदर्शन केलं होतं.शाहीन बाग, जस्टीस फॉर मोसिन मोमेंट, UPSC हज हाऊस सेंटर सारख्या अनेक राज्यव्यापी आंदोलनात सक्रिय भूमिका बजावलेली आहे. आजच्या राजकारणात सुशिक्षित तरुणांनी पुढे येणे ही काळाची गरज आहे. पारदर्शकता, नवा विचार आणि प्रामाणिकपणा घेऊन जर तरुणाईने पुढाकार घेतला तर समाजाचा चेहरामोहरा बदलू शकतो. सफियान मणियार हे अशाच नव्या पिढीचे प्रतिनिधी आहेत. त्यांच्या कामाचा दखल आणि निष्ठा लोकांनी ओळखून या निवडणुकीत त्यांना पाठिंबा देणे ही समाजाची जबाबदारी आहे. सामाजिक कार्यातून तयार झालेला हा तरुण नेता लोकांच्या अपेक्षांना नक्कीच न्याय देईल. या वेळी निवडणुकीत सफियान मणियार यांना प्रचंड बहुमताने विजयी करून समाजाला सुशिक्षित, प्रामाणिक आणि कार्यक्षम नेतृत्व मिळवून देऊया. ?
सुशिक्षित तरुणांना निवडणुकीत सहभागी करणे हे आपल्याच भविष्याची हमी आहे.





दैनिक लोकक्रांतीचा आरंभ
# लोकआरंभ
संपादकःराहुल मारोतीराव वाईकर

गुरुवार १६ ऑक्टोबर २०२५
https://lokaarambh.com



## पोटात जातात आणि आजाराला निमंत्रण मिळते.



दिवसभर आपण बरीच काम करत असतो, प्रवास करत असतो. धुळ, प्रदूषण यामुळे नक्कीच आपण अनेक जंतूंच्या संपर्कात येतो. मग ते घरातील वस्तू असू दे किंवा मग बाहेरच्या वस्तू. आणि कधीकधी त्याचे आपल्याला भान राहत नाही त्याच हातांनी मग आपण काहीही अन्न खातो. त्यामुळे त्यावाटे अनेक जंतू पोटात जातात आणि आजाराला निमंत्रण मिळते. संसर्ग पसरण्याचा धोका असतो. बरं या वस्तू रोज संपर्कात येणाऱ्या असल्याने काही वेळेला त्यांना टाळणे शक्य होत नाही पण त्यापासून स्वत:चे आरोग्य नक्कीच जपू शकतो. पण आपल्या आजुबाजूला असलेल्या अशा कोणत्या गोष्टी आहेत ज्या जंतूंनी भरलेल्या असतात. आणि कळत-नकळत आपला त्यांच्याशी संपर्क येतच असतो. हे जाणून घेऊयात. हँडल, रेलिंग आणि दरवाजाचे नॉब – सार्वजनिक ठिकाणी सर्वात जास्त स्पर्श केल्या जाणाऱ्या वस्तूंपैकी डोअरनॉब, सबवे रेलिंग आणि एस्केलेटर ग्रिप आहेत. दररोज हजारो लोक त्यांना स्पर्श करतात, ज्यामुळे ते बॅक्टेरिया आणि विषाणूंसाठी हॉटस्पॉट बनतात. त्यांना स्पर्श केल्यानंतर आपले हात धुण्यास विसरू नका.

रेस्टॉरंट मेनू कार्ड – तुम्हाला हे जाणून आश्चर्य वाटेल की एका मेनू कार्डवर 180,000 प्रकारचे बॅक्टेरिया असू शकतात. दिवसभरात त्यांना अनेक लोक स्पर्श करत असल्याने आणि क्वचितच स्वच्छ केले जात असल्याने ते जंतू नक्कीच आपल्या हाताला लागून त्यातून आजार पसरण्याची शक्यता असते.त्यामुळे जेवण्यापूर्वी हात धुणे अत्यंत महत्वाचे आहे.

डॉक्टरांच्या क्लिनिकमधील वस्तू – डॉक्टर आजारी लोकांना तपासतात आणि तिथे असलेले सर्व काही जसं की, साइन-इन पेन, खुर्चीच्या आर्मरेस्ट आणि दाराचे हँडल हे नक्कीच जंतूंनी भरलेले असते. क्लिनिकमधून परतल्यानंतर हात धुणे सगळ्यात महत्त्वाचे आहे. किंवा दवाखाण्यात जातानाच सोबत हँड सॅनेटायझर घेऊन जाणे योग्य ठरेल.

पाळीव प्राणी – तुमचे पाळीव प्राणी जरी निरोगी दिसत असले तरी, ते त्यांचे फर, लाळ आणि नखांमधून बॅक्टेरिया किंवा परजीवी पसरवू शकतात. त्यांना स्पर्श केल्यानंतर, खायला दिल्यानंतर किंवा स्वच्छ केल्यानंतर तुमचे हात धुणे महत्वाचे आहे.

टचस्क्रीन उपकरणे – मोबाईल फोन, टॅब्लेट किंवा विमानतळावरील कियोस्क स्क्रीन सतत स्पर्श केल्या जातात परंतु क्वचितच स्वच्छ केल्या जातात. संशोधनातून असे दिसून आले आहे की मोबाईल फोनमध्ये टॉयलेट सीटपेक्षा 10 पट जास्त बॅक्टेरिया असतात. वापरल्यानंतर तुमचे हात धुवा आणि तुमची उपकरणे नियमितपणे स्वच्छ करा.

स्वयंपाकघरातील स्पंज आणि कटिंग बोर्ड – स्वयंपाकघरातील स्पंज आणि कटिंग बोर्ड हे बॅक्टेरियांसाठी प्रजनन स्थळे आहेत. विशेषतः जेव्हा कच्चे मांस त्यांच्यावर ठेवले जाते आणि कापले जाते तेव्हा ते बॅक्टेरिया वाढण्याची शक्यता असते. अशावेळी या वस्तूंना हाताळल्यानंतर हात धुणे तुमच्या आरोग्यासाठी आवश्यक आहे.

इतरांचे पेन – इतरांनी वापरलेल्या पेनमधून बॅक्टेरिया तुमच्या हाताच्या सहजपणे संपर्कात येऊ शकतात. त्यामुळे पेन वापरल्यानंतर हात धुवा किंवा सॅनिटाईझ करा.

साबण डिस्पेंसर – हे ऐकायला विचित्र वाटेल, पण साबणाच्या बाटल्या आणि डिस्पेंसर देखील जंतूंचे स्थान असते. रिफिल करण्यायोग्य साबणाच्या बाटल्यांबाबत विशेषतः काळजी घेतली पाहिजे. त्यांच्या पृष्ठभागावर जंतू जमा होऊ शकतात. त्यामुळे या वस्तूही स्वच्छ ठेवणे गरजेचे असते.

ट्रेन किंवा रिक्षाचे हँडल – रोज प्रवास करताना लाखो लोकांचे हात त्या हँडलला लागत असतात. त्यामुळे जंतू आणि आजार दोन्ही गोष्टी आपल्या संपर्कात येऊ शकतात. त्यासाठी हात धुवा किंवा सॅनिटाईज करा. तसेच लोकल ट्रेनमध्ये प्रवास करताना किंवा कोणत्याही वाहनातून प्रवास करताना त्यांच्या खिडक्यांना अजिबात स्पर्श करू नका.

# राष्ट्रीय सेवा योजना विभागाच्या वतीने पूरग्रस्तांना मदत

: पाटोदा पाटोदा येथील जय भवानी कला व विज्ञान महाविद्यालय राष्ट्रीय सेवा योजना विभागाच्या वतीने सोलापूर जिल्ह्यात व मराठवाड्यात झालेल्या अतिवृष्टीमुळे पूरग्रस्तांना राष्ट्रीय सेवा योजना विभागाच्या वतीने दिवाळीनिमित्त नवीन कपडे व साहित्याचे वाटप करण्यात आले या मदत फेरीच्या माध्यमातून स्वयंसेवकांनी शर्ट साड्या ब्लँकेट्ठ इत्यादी कपड्याची संकलन करून महाविद्यालयाच्या वतीने जिल्हा समन्वयक डॉक्टर अरुण दयतकर यांना ही मदत बंकट स्वामी महाविद्यालयात स्वीकृत करण्यात आली यावेळी महाविद्यालयाची सन्माननीय प्राचार्य डॉ सदाशिव सरकटे प्राचार्य डॉ विश्वास कदम यांच्या शुभहस्ते प्राध्यापक सोमनाथ घाडगे सर कार्यक्रमाधिकारी डॉ लोखंडे सर प्राध्यापक बापू घोक्षे प्राध्यापक प्रकाश




नाईकवाडे प्राध्यापक बाळासाहेब जोशी आणि महाविद्यालयातील स्वयंसेवक उपस्थित होते माननीय जिल्हाधिकारी बीड यांच्या वतीने ही मदत बीड जिल्ह्यातील पूरग्रस्तांना वाटप करण्यात येणार आहे या कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी कार्यक्रमाधिकारी प्राध्यापक बापू गोखले प्राध्यापक लोखंडे राष्ट्रीय सेवा योजना विभागाची स्वयंसेवक सौरभते मॅडम प्राध्यापक सुर्वे सर कनिष्ठ विभागाचे प्रमुख प्राध्यापक नाईकवाडे सर प्राध्यापक भुरे सर प्राध्यापक भगत सर प्राध्यापक वंदन जाधव सर यांनी सहकार्य केले या समाज उपयोगी कार्याबद्दल राष्ट्रीय सेवा योजना विभागाची महाविद्यालयाच्या वतीने अभिनंदन करण्यात आले

# कठोर परिश्रमातून केलेल्या समाज सेवेचे फळ मिळाले – अयुब खान

बीड प्रतिनिधी

सुशिक्षित बेरोजगार यांना रोजगार उपलब्ध करून देण्यासाठी घेतलेली मेहनतविल्कॉन कन्सल्टन्सीचे संचालक अय्युब खान पठाण यांना मानद डॉक्टरेट पुरस्कार मिळालासुशिक्षित बेरोजगार यांना रोजगार उपलब्ध करून देण्यासाठी घेतलेली मेहनत आज कामी अली.मॅजिक बुक ऑफ रेकॉर्ड मॅजिक ॲण्ड आर्ट युनिव्हर्सिटी फाऊंडेशनने जाहीर केले पुरस्कार १९ ऑक्टोबर २०२५ रोजी कॅसल ऑफ आर्ट थिएटर फरिदाबाद दिल्ली येथे पुरस्काराचे वितरण अय्युब खान यांच्या सन्मानाने महाराष्ट्र राज्याचे नाव लौकीक मराठवाडा व विदर्भातील वेपरांसाठी अच्युव व्यान यांची यशस्वी तळमळ बेरोजगार तरुण-तरुणींसाठी विशेष लढा उभा केला, अनेक बेरोजगारांना रोजगार उपलब्ध करून दिलेतिर्थक्षेत्राचे सर्वेक्षण करून विकास आराखडे शासनाकडे सादर अयुब खान यांनी मराठवाडा व विदर्भातील बंना घरकुल योजनेचा लाभ मिळणून दिला.बिल्कॉन कन्सल्टन्सीचेसमाजकार्यात नेहमी अग्रेसर असलेले तसेच गोरगरीब व गरजूंच्या मदतीसाठी सदैव तत्पर असलेले तसेच घरकुल योजनेतून बेघरांना दिलासा देणारे बेरोजगारांच्या हाताला कामासाठी नेहमी झटणारे बिल्कॉन कन्सल्टन्सीचे संचालक अय्युब खान यांचा मानद डॉक्टरेट पुरस्काराने सन्मान झाला असून सदरील पुरस्कार मॅजिक बुक ऑफ रेकॉर्ड मॅजिक ॲण्ड आर्ट युनिव्हर्सिटी फाऊंडेशनने ११ ऑक्टोबर २०२५ रोजी कॅसल ऑफ आर्ट थिएटर फरिदाबाद दिल्ली येथे या



पुरस्काराचे मान्यवरांच्या हस्ते मिळाला. अय्युब खान यांना मानद डॉक्टरेट पुरस्कार जाहीर झाल्याबद्दल मित्रपरिवारांनी त्यांच्यावर शुभेच्छांचा वर्षाव केला. तसेच अय्युब खान यांना मिळालेला पुरस्कार हा महाराष्ट्र राज्याचे नाव लौकीक करणारा हा पुरस्कार आहे.

छत्रपती संभाजीनगर येथील बिल्कॉन कन्सल्टीचे संचालक अय्युब खान यांना पूर्वीपासूनच पत्रकारितेचा छंद असल्याने लोकस्वतंत्र पत्रकार महासंघ मराठवाडा याचे संपर्कप्रमुख म्हणून त्यांचे कार्य उल्लेखनीय आहे. तसेच लोकशाही पत्रकारसंघ याचे ते कार्याध्यक्ष असून सरपंच सेवासंघ मराठवाडा याचेही कार्याध्यक्षपद त्यांच्याकडेच आहे. पोलीस हक्क संरक्षण संघटना

सुशिक्षित बेरोजगार यांना रोजगार उपलब्ध करून देण्यासाठी घेतलेली मेहनत

मराठवाड्यामध्ये सुशिक्षित बेरोजगार तरुण व तरुणी यांचे रोजगार विषयक मेळावे घेवून त्यांना रोजगार उपलब्ध करून देण्यासाठी अय्युब खान यांनी कठोर परिश्रम घेतले. त्यांच्या या प्रयत्नातून अनेक बेरोजगार तरुणांना रोजगार तर मिळालाच शिवाय णांना नवी दिशा देण्याचे काम अय्युब खान यान ठशश्रि म्हणजे समाजकार्य करताना अय्युब खान यांनी जातीपातीचे समाजकारण केले नाही. परिणामी आज त्यांच्या या परिश्रमाचे फळ पुरस्काराच्या स्वरूपातून त्यांना मिळत आहे. भविष्यातही बेरोजगार तरुण व बघरांसाठी मी झटत राहणार.तिर्थक्षेत्राचे सर्वेक्षण करून विकास आराखडे शासनाकडे सादर

अय्युब खान पठाण हे दर्जेदार शासकीय कंत्राटदार आहेत. मागील अनेक वर्षांपासून दर्जेदार कामे करून त्यांनी आपली ओळख निर्माण केली आहे. महाराष्ट्रातील विविध तिर्थक्षेत्राचे सर्वेक्षण करून त्यांचे विकास आराखडे तयार करून शासनाला सादर केले. त्यांनी सादर केलेल्या आराखड्याची शासनानेही दखल घेत अनेक तिर्थक्षेत्राला निधी उपलब्ध करून दिला. त्याशिवाय २०११ ते २०१७ या वर्षात त्यांनी नदी-तलाव संवर्धन योजनेअंतर्गत सुद्धा सर्वेक्षणासह सविस्तर प्रकल्प अहवाल तयार करण्याचे काम केले. शासनाने त्यांच्या या कार्याचीही मोठी दखल घेतलेली असून अय्युब खान यांची यामुळेच दर्जेदार कंत्राटदार म्हणून राज्यभरात ओळख निर्माण झालेली आहे.

कार्यक्रम संपूर्ण महाराष्ट्रात सन २००२ ते २०१५ या वर्षापर्यंत राबविला. असंघटित कामकारांना शासनाच्या विविध योजनेचा लाभमिळवून दिला. अशाप्रकारे अय्युब खान यांची कामगिरी उल्लेखनिय राहिली. त्यांच्या या सर्व कामांची दखल घेत मॅजिक बुक ऑफ

अय्युब खान यांनी मराठवाडा व विदर्भातील बेघरांना घरकुल योजनेचा लाभ मिळवून दिला. तसेंच

ग्रामीण व शहरी भागातील अतिक्रमित बेघर नागरिकांना त्यांच्या जागेचे नियमाकुल करण्यासाठी शासनाच्या विविध शासन निर्णयाचा संदर्भ घेवून महाराष्ट्रातील २५ हजार लाभार्थ्यांचे अतिक्रमण नियमाकुल करून त्यांना घरकुल योजनेचा लाभअय्युब खान यांनी मिळवून दिला. तसेच रमाई घरकुल योजनेअंतर्गत मराठवाडा व विदर्भातील ३० हजार लाभार्थ्यांना प्रकल्प व्यवस्थापनाच्या माध्यमातून घरकुल योजनेचा लाभमिळवून देण्यासाठी परिश्रम घेतले. सध्या या लाभार्थ्यांसाठी पाठपुरावा सुरू आहे. अय्युब खान यांच्या या कार्याची दखल च झाल्यानेच त्यांना वरील पुरस्कार मिळाला असून कठोर परिश्रमातून केलेल्या समाजसेवेचे हे फळच म्हणावे लागेल.

रेकॉर्ड मॅजिक ॲण्ड आर्ट युनिव्हर्सिटी फाऊंडेशनने त्यांना मानद डॉक्टरेट पुरस्कार जाहीर केला. या पुरस्कार मिळाल्यावर मित्रपरिवारांनी जल्लोष साजरा करून त्यांना पुढील कार्यास शुभेच्छा दिल्या.

# एका आईची जाणीव प्रत्येक मूल आपल्या गतीने फुलतं त्याला स्वीकारणं हीच खरी पालकत्वाची कसोटी

तो एक साधा दिवस होता. मी घरी नेहमीप्रमाणे कामात गुंतले होते. थोड्याच वेळात मुलगा शाळेतून आला. त्याच्या हातात गुणपत्रक होतं. चेहऱ्यावर एक हलकासा उदास भाव होता. मी विचारलं, “काय झालं?” तो शांतच राहिला. मीच गुणपत्रक हातात घेतलं — गुण अगदी वाईट नव्हते, पण प्रत्येक विषयात दोन-तीन गुणांनी कमी. माझ्या सहकाऱ्यांची मुलं CBSE आणि ICSE बोर्डांमध्ये शिकतात. त्यांचं जग अगदी वेगळं — स्पर्धा, उपक्रम, आणि सततची यशं.माझा मूलगा मात्र स्टेट बोर्डात, तेही मराठी माध्यमात शिकतो. मी स्वतः थोडीफार प्रसिध्द असल्याने लोक माझ्या मुलाकडूनही मोठ्या अपेक्षा ठेवतात. आणि नकळत मी सुद्धा त्या अपेक्षा त्याच्यावर लादल्या.



त्या दिवशी मी त्याच्यावर खूप राग काढला. त्याचे गुण पाहून मनात आलेली निराशा, असंतोष, सगळं त्याच्यावर उतरवलं. एका क्षणात मी विसरले की माझा मुलगा अजून लहान आहे, शिकतो आहे, चुका करतो आहे. जरी मी मुलांच्या मानसिक आरोग्याविषयी अनेक लेख वाचले होते, तरी त्या क्षणी मी फक्त एक “सामान्य पालक” ठरले. काही दिवसांनी माझ्या एका मैत्रिणीचा फोन आला. खूप दिवसांनी आम्ही बोलत होतो. सहज विचारलं, “काय गं, अचानक सुट्टी घेतलीस का?” तेव्हा ती शांत आवाजात म्हणाली, “माझा मुलगा ‘ऑटिझम’चा रुग्ण आहे.” तिचं पुढचं वाक्य मात्र माझ्या मनाला चिरून गेलं — “तुम्हाला तुमची मुलं तुम्हाला रँकर हवी असतील, पण मला माझं मूल रोजच्या छोट्या गोष्टी स्वतः करू शकेल एवढंच हवं आहे. तो चालेल, खेळेल, हसेल, इतर मुलांसारख्या खोड्या काढेल, मी आनंदाने स्वीकारेन कि कुणी येऊन माझ्या दारात माझ्या मुलाच्या तक्रारी करेल — एवढं झालं तरी मला वाटेल की माझा मुलगा डॉक्टर झाला.म्हणजे ज्या गोष्टी आपली मुलं अगदी सहज करतात त्या गोष्टी तिच्या मुलाने कराव्यात ते तिचं स्वप्न आहे. त्या क्षणी माझ्या डोळ्यांत अश्रू आले. मी माझ्या मुलाकडे नव्या दृष्टीने पाहायला लागले. आता मी त्याच्या गुणांकडे पाहत नाही, तर त्याच्या प्रयत्नांकडे पाहते. तो रोज थोडं थोडं शिकतोय, आत्मविश्वास वाढवतोय — हेच माझं खरं समाधान आहे. प्रत्येक मूल वेगळं असतं, त्याच्या क्षमतेनुसारच ते फुलतं. काही मुलं वेगाने धावतात, काही थोडं हळू चालतात — पण दोघांचंही आकाश सारखंच असतं. पालक म्हणून आपली जबाबदारी म्हणजे त्यांना तो आकाशाचा तुकडा देणं, ज्यात ते मोकळेपणाने उडू शकतील.

खरं तर, आपली मुलं आपल्या अपेक्षेप्रमाणे नव्हे, तर त्यांच्या स्वभावानुसार जगली, तरच आपण पालक म्हणून यशस्वी ठरतो.

लेखिका : सविता देवरे - जगताप

# एसटी बँकेत भर बैठकीत राडा, बाटल्या फेकल्या; सदावर्ते आणि शिंदे गटात तुफान हाणामारी

मुंबई : राज्याची राजधानी मुंबईतून एक धक्कादायक आणि मोठी बातमी समोर आली आहे. महाराष्ट्र राज्य परिवहन मंडळाच्या (MSRTC) एसटी बँकेच्या संचालक मंडळाच्या बैठकीत आज मोठा गोंधळ आणि तुफान राडा झाल्याचे वृत्त आहे. या बैठकीदरम्यान, शिवसेना (शिंदे गट) आणि सदावर्ते गट यांच्या प्रतिनिधींमध्ये जोरदार शाब्दिक बाचाबाची झाली, ज्याचे रूपांतर अखेरीस हाणामारीत झाले. मिळालेल्या माहितीनुसार, बैठकीत अपमानास्पद भाषा वापरल्यामुळे तसेच बँकेतील कथित भ्रष्टाचाराच्या गंभीर आरोपांवरून हा संघर्ष उफाळून आला. या राड्यामुळे बँकेच्या कामकाजावर प्रश्नचिन्ह उभे राहिले आहे. या घटनेनंतर आता दोन्ही गटांकडून नागपाडा पोलीस ठाण्यात एकमेकांविरुद्ध तक्रार दाखल करण्याची प्रक्रिया सुरू असल्याची माहिती समोर येत आहे. एसटी बँक संचालक मंडळातील या हाणामारीमुळे मुंबईतील राजकीय आणि सहकार क्षेत्रात मोठी खळबळ माजली आहे.





‘रेकॉर्डिंग’च्या वादातून हाणामारी

एसटी बँकेच्या संचालक मंडळाच्या बैठकीत झालेल्या राड्याचा व्हिडिओ समोर आल्यामुळे या घटनेचे नाट्यमय स्वरूप उघड झाले आहे. व्हिडिओमध्ये स्पष्ट दिसते की, बैठकीत सुरुवातीला एक संचालक उभे राहून सक्त ताकीद देत आहेत. ते म्हणत आहेत की, “ही संचालक मंडळाची बैठक आहे. या बैठकीचे कोणीही रेकॉर्डिंग करू नये, तसेच या बैठकीचा आऊटपूट बाहेर जाता कामा नये, असे आक्षेपार्ह वर्तन कुणीही करू नये.” मात्र, या इशाऱ्यानंतरही हा गोंधळ थांबला नाही आणि बैठकीत तात्काळ मोठा राडा सुरू झाला. संचालक एकमेकांकडे हातवारे करून भांडू लागले. हाणामारी वाढल्यानंतर त्यांनी एकमेकांवर बाटल्या आणि इतर वस्तू फेकण्यास सुरुवात केली. या अत्यंत हिंसक हाणामारीत एकनाथ शिंदे-आनंदराव अडसूळ यांच्या संघटनेचे (शिंदे गट) ४ ते ५ संचालक जखमी झाले असल्याची प्राथमिक माहिती समोर येत आहे. ‘भ्रष्टाचार’ आणि ‘अशोभनीय भाषा’ यांसारख्या गंभीर मुद्द्यांवरून झालेला हा राडा एका प्रतिष्ठित सहकारी बँकेच्या इतिहासातील अत्यंत लाजीरवाणी घटना मानली जात आहे.

‘शिंदे-अडसूळ’ आणि ‘सदावर्ते’ गट थेट पोलीस ठाण्यात

आज सकाळी एसटी बँकेच्या संचालक मंडळाची बैठक सुरू असतानाच हा गंभीर राडा झाला. या बैठकीला सदावर्ते यांच्या पॅनलचे सर्व संचालक आणि शिवसेना अडसूळ पॅनलचे संचालकही उपस्थित होते. या हाणामारीच्या मुळाशी एक अत्यंत संवेदनशील आणि गंभीर आरोप असल्याचे समोर आले आहे. अडसूळ पॅनलच्या संचालकांनी, सदावर्ते यांच्या पॅनलमधील संचालकांनी बँकेच्या महिला कर्मचाऱ्यांशी अश्लील वर्तन केले, असा गंभीर आरोप केला. याच आरोपानंतर बैठकीत प्रचंड तणाव वाढला आणि त्याचे रूपांतर मारहाणीत झाले. या मोठ्या राड्यानंतर दोन्ही गटांनी त्वरित नागपाडा पोलीस ठाण्यात धाव घेतली आहे. सध्या पोलिसांकडून दोन्ही गटांच्या तक्रारी नोंदवून घेण्याची आणि त्यानुसार गुन्हा दाखल करण्याची प्रक्रिया सुरू आहे. सहकारी बँकेच्या संचालक मंडळात झालेल्या या मारहाणीमुळे प्रकरणाचे गांभीर्य अधिक वाढले आहे.

एसटी बँकेच्या बैठकीत ‘जातीवाचक शिवीगाळ’ झाल्याचा गंभीर आरोप

या घटनेच्या संचालकाने दिलेल्या माहितीनुसार, आज बँकेतील कर्मचाऱ्यांच्या दिवाळी बोनससंदर्भात चर्चा करण्यासाठी ही बैठक बोलावण्यात आली होती. मात्र, बैठकीत उपस्थित असलेल्या काही विरोधी संचालकांनी आक्षेपार्ह वर्तन करत, ‘आमच्या महिलांचा अपमान केला’. हा वाद इतका वाढला की, संतप्त झालेल्या संचालकांनी ‘महिलांचे कपडे फाडले, मंगळसूत्र तोडले आणि जातीवाचक शिवीगाळ’ देखील केली, असा धक्कादायक आरोप करण्यात आला आहे. या गंभीर आरोपांमुळेच हाणामारीचा मोठा वाद निर्माण झाला. एका संचालकांनी स्पष्ट केले की, ‘त्या विरोधी संचालकांकडून वारंवार महिलांचा अपमान होत असल्याने, या वेळी हा राडा झाला.’ या संपूर्ण प्रकरणाची फिर्याद (FIR) देण्यासाठी आम्ही आता पोलीस ठाण्यात आलो आहोत, असेही त्यांनी सांगितले. महिलांचा अपमान आणि जातीवाचक शिवीगाळ यांसारख्या गंभीर आरोपांमुळे या घटनेचे स्वरूप केवळ राजकीय वादापुरते मर्यादित न राहता, आता ते कायद्याच्या चौकटीत अधिक गंभीर बनले आहे.

# तितरवणी परिसरात अवैध धंद्यांचा सुळसुळाट; पोलीस कर्मचाऱ्यांवर हप्तेखोरीचा आरोप बीडमध्ये पोलीस अधीक्षकांकडे तक्रार

### अवैध धंदे थांबवावीत, संबंधित पोलीस कर्मचाऱ्यांवर कारवाई व्हावी.

बीड (प्रतिनिधी)- तिंतरवणी (ता. शिरूर कासार) आणि आसपासच्या परिसरात वाळू, मटका आणि जुगार यांसारखे अवैध धंदे खुलेआम सुरू असून, यामध्ये काही पोलीस कर्मचाऱ्यांचा थेट सहभाग आणि 'हप्तेखोरी' असल्याचे गंभीर आरोप करत महेश राधाकिसन कापरे (रा. तिंतरवणी) यांनी बीडच्या पोलीस अधीक्षक कार्यालयाकडे लेखी निवेदन दिले आहे. अवैध धंदे थांबवावेत आणि संबंधित पोलीस कर्मचाऱ्यांची दहशत संपवावी, अशी मागणी अर्जदाराने केली आहे. काय आहे तक्रार ? दिनांक१३/१०/२०२५रोजीपोलीसअधीक्षक साहेब, बीड यांना दिलेल्या निवेदनात महेश कापरे यांनी म्हटले आहे की, तिंतरवणी गाव हे चकलंबा पोलीस स्टेशनच्या हद्दीत येते. या परिसरात अवैध धंदे राजरोसपणे सुरू आहेत. या संदर्भात चकलंबा पोलीस स्टेशनचे पोलीस निरीक्षक संदीप पाटील यांना वारंवार पुराव्यांसह माहिती देऊनही त्यांनी कोणतीही ठोस कारवाई केली नाही. उलट, पाटील यांनी अर्जदाराला तुला जे करायचे ते कर, फक्त आम्हाला हप्ता देत राहा. आमचे कोणीही वाकडे करू शकत नाही, अशी धमकी देत खोट्या गुन्ह्यात गुंतवण्याची धमकी दिल्याचे तक्रारीत नमूद आहे. कर्मचाऱ्यांवर थेट भागीदारीचा आरोप याशिवाय, अर्जदाराने बीट अंमलदार किरण मिसाळ आणि अमोल येळे यांच्यावर थेट अवैध धंद्यांमध्ये भागीदार असल्याचा आणि त्यांच्या बँक खात्यात



सर्रासपणे 'हप्ते' जमा होत असल्याचा गंभीर आरोप केला आहे. हे कर्मचारी वाळू, मटका, जुगार अशा अनेक धंद्यांमध्ये भागीदार असून, त्यांना जाब विचारल्यास ते धमकीवजा भाषा वापरतात, असेही तक्रारीत म्हटले आहे. जीविताला धोका असल्याची भीती अर्जदार महेश कापरे यांनी निवेदनाच्या शेवटी आपल्या जीवितास धोका असून, या धोक्यास पोलीस प्रशासनाची निष्क्रियता सर्वस्वी जबाबदार राहील, याची नोंद घ्यावी, अशी नम्र विनंती पोलीस अधीक्षकांना केली आहे. या गंभीर आरोपांमुळे बीड पोलीस दलात खळबळ उडाली असून, पोलीस अधीक्षक या प्रकरणाची तातडीने दखल घेऊन चौकशी करणार का, याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.

### अवैध धंद्यांमध्ये भागीदार असल्याचा आरोप

तक्रारीत बीट अंमलदार किरण मिसाळ आणि अमोल येळे यांच्यावर अवैध धंद्यांमध्ये भागीदार असल्याचा आरोप केला असून, त्यांच्या बँक खात्यात सर्रासपणे 'हप्ते' जमा होत असल्याचे नमूद केले आहे.
महेश कापरे यांनी बीड पोलीस अधीक्षकांकडे दिलेल्या निवेदनात तिंतरवणी परिसरात वाळू, मटका, जुगार अशा अवैध धंद्यांमध्ये पोलीस कर्मचाऱ्यांचा थेट सहभाग असल्याचा दावा केला.

# जरेवाडीतील आगीत खामकर यांच्या घराची झाली राख भाऊसाहेब आण्णा भवर बनले आधाराचा हात!

पाटोदा (प्रतिनिधी) जरेवाडी गावात हनुमान खामकर यांच्या राहत्या घराला लागलेल्या आगीत काही क्षणांतच सर्व काही जळून खाक झाले. कष्टाने उभारलेले घर, संसाराचा प्रत्येक कोपरा क्षणभरात राखेत परिवर्तित झाला. डोळ्यांसमोर आयुष्यभराची जमा-पूंजी जळताना पाहून खामकर कुटुंबाचे डोळे अश्रूंनी भरून आले.या दुःखाच्या काळात अंमळनेर जिल्हा परिषद गटाचे नेते भाऊसाहेब आण्णा भवर यांनी गावात येऊन जळीतग्रस्त कुटुंबाला भेट दिली. त्यांनी आधाराचा हात देत मनापासून दिलासा दिला. त्यांच्या चेहऱ्यावरची माया आणि आपुलकी पाहून कुटुंबातील प्रत्येकाच्या डोळ्यात अश्रूंऐवजी कृतज्ञतेचे पाणी दाटले.भाऊसाहेब आण्णा भवर यांनी संकटग्रस्त कुटुंबाला ₹21,000/- ची आर्थिक मदत देत माणुसकीचा सुंदर आदर्श घालून दिला.त्यांनी केवळ पैशांनी नव्हे, तर आपल्या उपस्थितीने आणि मनःपूर्वक शब्दांनी जखमी मनांना मलम लावले."आगीत आमचं सर्व काही गेलं, पण भाऊसाहेबांनी दिलेला आधार आम्हाला नवसंजीवनी देऊन गेला," असे अश्रूंनी भरलेल्या डोळ्यांनी खामकर यांनी सांगितले. गावकऱ्यांनी एकमुखाने म्हटलं "संकटात माणसाची ओळख होते... आणि भाऊसाहेब आण्णा भवर यांनी खरी माणुसकी दाखवली!"



# मानसिंग शाहुराव राठोड यांचे वृद्धापकाळाने निधन

### कॉ पांडुरंग राठोड यांना पितृशोक



परळी वैजनाथ ता. १५ प्रतिनिधी सिरसाळा येथील मानसिंग शाहुराव राठोड (वय ९९ वर्षे) यांचे बुधवारी (ता १५) पहाटे सहा वाजता वृद्धापकाळाने निधन झाले. त्यांच्यावर दुपारी चार वाजता सिरसाळा येथील शिवाजीनगर तांडा येथे अंत्यसंस्कार करण्यात आले. यावेळी राजकीय, सामाजिक क्षेत्रातील मान्यवर मोठ्या संख्येने उपस्थित होते. राख सावडण्याचा विधी शुक्रवारी (ता १७) सकाळी ७:३० होणार आहे. त्यांच्या पश्चात उत्तम राठोड, मार्क्सवादी कम्युनिस्ट पक्षाचे नेते कॉ पांडुरंग राठोड, सेवानिवृत्त कृषी अधिकारी रोहीदास राठोड यांच्यासह चार मुली, सुना, जावई, नातवंडे असा मोठा परिवार आहे.


## मोईन मेहरताज खान चे ट्राफी व सर्टिफिकेट देऊन सत्कार व सन्मान



माजलगाव प्रतिनिधी माजलगाव करांच्या साठी ही आनंदाची बाब आहे एक सर्व सामान्य घरातल्या मुलाला कायद्याचे विद्यार्थी टीम चे नेतृत्व करण्याची संधी भेटली व त्यांच्या सह त्याच्या पुर्ण टीम चे या उत्कृष्ट कामगिरी बद्दल सत्कार व सन्मान जालना जिल्हाधिकारीच्या वतीने करण्यात आले.एम.एस.एस लॉ कॉलेज जालना येथे माजलगांव चे सुपुत्र मोईन मेहरताज खान यांनी व विद्यार्थ्यी मित्र टीम ने इंदेवाडी, जालना या ठिकाणी चाईल्ड मॅरेज प्रोहिबीशन ॲक्ट २००६ या कायद्याची सखोल माहिती आपल्या कलेतुन सादर करुन दाखविले व समाजात चांगला मॅसेज दीला त्याची दखल घेत जालना जिल्हाअधिकारी मा.श्री. आशिमा मित्तल (आए.ए.एस) मॅडम यांनी मोईन मेहरताज खान व त्यांच्या टीम चे ट्राफी व सर्टिफिकेट देऊन सत्कार व सन्मान केला या प्रसंगी संस्थेचे सचिव मा.श्री.मनिषाताई टोपे साहेब ही उपस्थित होते ही बाब माजलगांव च्या जनते पर्यंत पोहचताच माजलगांव चा युवा वर्ग त्यांना सोशल मिडिया च्या व दुरध्वनी आणि इतर माध्यमातून शुभेच्छा देऊ लागला या कामगिरी बद्दल त्यांचे खुप खुप अभिनंदन.

# महाभारतातील कर्ण काळाच्या पडद्याआड

मुंबई _महाभारतातील कर्णाची भूमिका साकारणारे अभिनेते पंकज धीर यांचे निधन झाले आहे. त्यांच्या जाण्याने मनोरंजन विश्वावर शोककळा पसरली आहे. पंकज धीर यांना कॅन्सर झाला होता. गेल्या अनेक वर्षांपासून ते कॅन्सरशी झुंज देत होते पण ती अपयशी ठरली. मुंबईमध्ये त्यांचे निधन झाले. वयाच्या ६८ व्या वर्षी त्यांनी जगाचा निरोप घेतला. पंकज धीर यांनी बीआर चोप्रा यांच्या 'महाभारत' मध्ये कर्ण हे पात्र साकारले होते. या मालिकेच्या माध्यमातून ते घराघरामध्ये पोहचले होते. त्यांनी बॉलिवूडचे अनेक चित्रपट आणि मालिकांमध्ये



काम केले होते. पंकज धीर यांना काही वर्षांपूर्वी कॅन्सर झाला. त्यातून ते बरे देखील झाले होते. पण काही महिन्यांपूर्वी त्यांना पुन्हा कॅन्सर झाला. त्यानंतर त्यांची प्रकृती खूपच खालावली. त्यांच्यावर शस्त्रक्रिया देखील झाली होती आणि रुग्णालयात उपचार सुरू होते. उपचार सुरू असताना त्यांची प्रकृती खूपच बिघडत गेली आणि ते हे जग सोडून गेले. त्यांच्या निधनाचे वृत्त कळताच बॉलिवूड आणि टीव्ही इंडस्ट्रीतील कलाकार आणि त्यांचे चाहते सोशल मीडियावर पोस्ट करत त्यांना श्रद्धांजली वाहत आहेत.

# संस्कार प्राथमिक शाळा, पद्मावती विभागात डॉ. अब्दुल कलाम यांची जयंती वाचन प्रेरणा दिन म्हणून साजरी

### डॉ. ए.पी.जे.अब्दुल कलाम हे युवकांना प्रेरणा देणारे आदर्श व्यक्तिमत्व

**मिसाईलमॅनम्हणूनओळखल्याजाणाऱ्या कलाम यांनी देशसेवेसाठी आपले जीवन समर्पित केले." - दीपक तांदळे**

परळी ( प्रतिनिधी ) - शहरातील पद्मावती शिक्षण संस्था संचलित, संस्कार प्राथमिक शाळा, पद्मावती विभागात भारताचे माजी राष्ट्रपती भारतरत्न डॉ. ए.पी.जे. अब्दुल कलाम यांच्या जयंतीचे औचित्य साधून वाचन प्रेरणा दिन उत्साहात साजरा करण्यात आला. या कार्यक्रमाचे अध्यक्ष श्री. कैलास तांदळे सर (अध्यक्ष, पद्मावती शिक्षण संस्था), प्रमुख पाहुणे श्री. दीपक तांदळे सर (सचिव, पद्मावती शिक्षण संस्था), तसेच पद्मावती विभागाचे पर्यवेक्षक श्री इंगळे सर यांची उपस्थिती होती.कार्यक्रमाच्या सुरुवातीला उपस्थित मान्यवरांच्या हस्ते भारतरत्न डॉ. ए.पी. जे. अब्दुल कलाम व शिक्षणमहर्षी कै.विठ्ठलरावजी तांदळे सर यांच्या प्रतिमेचे पूजन करण्यात आले.

डॉ. ए.पी.जे. अब्दुल कलाम यांची जयंती संपूर्ण भारतभर वाचन प्रेरणा दिन म्हणून साजरी केली जाते. याचेच औचित्य साधून शाळेत वाचन प्रेरणा दिनाचा कार्यक्रम मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला. या कार्यक्रमांमध्ये शाळेतील विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते. विद्यार्थ्यांना आपल्या जीवनातील वाचनाचे महत्त्व समजावे व त्यांच्यात वाचनाची आवड निर्माण व्हावी यासाठी या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले.

यानंतर श्री पद्मावती शिक्षण संस्थेचे सचिव श्री दीपक तांदळे यांनी आपल्या मनोगतामध्ये "अब्दुल कलाम शेवटच्या श्वासापर्यंत



ज्ञानसाधनेत मग्न होते. म्हणूनच 15 ऑक्टोबर ही त्यांची जयंती "वाचन प्रेरणा दिन' म्हणून साजरी केली जावी याला विशेष औचित्य आहे. वाचन ही अशी सिद्धी आहे, की त्यामुळे आपल्याला एका हयातीत अनेक आयुष्ये जगता येतात. अनुभवविश्व व्यापक होतं.भारतरत्न डॉ. ए.पी.जे.अब्दुल कलामांच्या जीवन चरित्रावर प्रकाश टाकून विद्यार्थ्यांबद्दल असलेली त्यांची तळमळ तसेच वाचनाने आपली निर्णय घेण्याची क्षमता कशी वाढते, चांगल्या वाईट गोष्टीचे ज्ञान आत्मसात करण्यास मदत होते. विद्यार्थ्यांनी आपल्या आयुष्यातील काही वेळ नक्कीच वाचण्याकरता घालवावा म्हणजे कलामांच्या स्वप्नातील भारत नक्कीच तयार झालेला दिसेल असे वक्तव्य केले. पुढे बोलताना ते म्हणाले," वाचन म्हणजे जीवनाला उन्नत करणारी बाब असून यामुळे बुद्धीची चांगल्या प्रकारे मशागत होते. माणसाचे जीवन सुजलाम् सुफलाम् करण्यात वाचनाचा महत्त्वाचा वाटा असतो. म्हणून वाचनाचा छंद जोपासून प्रत्येकाने आपले जीवन समृद्ध करायला हवे."

या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन श्री. कांगणे सर यांनी केले. तर आभार श्रीमती पाटील मॅडम यांनी आभार व्यक्त केले यावेळी शाळेतील सर्व शिक्षक, शिक्षिका व शिक्षकेतर कर्मचारी उपस्थित होते आणि शेवटी शाळेतील सर्व विद्यार्थी व शिक्षकांनी पुस्तक वाचन करून वाचन प्रेरणा दिन हा कार्यक्रम आनंदात पार पाडला.

This Newspaper Printed, Publisher, Editor and Owned by RAHUL MARUTIRAO WAIKAR and Printed at RAJVEER PRINTERS, Rajmata Jijau Colony, Navgan Collage, Road,- Beed Dist - Beed Pin-431122 (Maharashtra) and Published At Dainik LOK AARAMBH OFFICE- House No. 01/03/862, Rajmata Jijau Colony, Navgan College Road,- Beed Dist - Beed Pin-431122 (Maharashtra). Editor- RAHUL MARUTIRAO WAIKAR Mobile: 9272132450 Email : dainiklokaarambh@gmail.com

हे पत्रक मालक, मुद्रक, प्रकाशक, संपादक राहुल मारुतीराव वाईकर यांनी राजवीर प्रिंटर्स, राजमाता जिजाऊ कॉलनी, नवगण कॉलेज रोड, बीड जि.बीड-४३११२२ (महाराष्ट्र) येथे छापून दैनिक लोक आरंभ कार्यालय, हाऊस नं.०१/०३/८६२० राजमाता जिजाऊ कॉलनी, नवगण कॉलेज रोड, बीड जि. बीड- ४३११२२ (महाराष्ट्र) येथे प्रसिद्ध केले. मो. ९२७२१३२४५०, संपादक: राहुल मारोतीराव वाईकर Email : dainiklokaarambh@gmail.com